**प्रेसनोट** **दिनांक १५/०५/२०१९**

---

पुणे पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ ०५ कार्यक्षेत्रात आमचे देखरेख व आदेशाने परिमंडळ 05 कार्यालयकाडील अधिकारी/स्टफच्या मदतीने वानवडी व मुंढवा पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये अवैध धंदे तसेच विहीत वेळेपेक्षा, बेकायदेशीरपणे, विनापरवाना चालणा-या डिस्कोथेक व त्यामध्ये होणारी मद्यविक्रीबाबत गोपनीय बातमी मिळाल्याने खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली.

१) वानवडी पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये परिमडंळ ०५ कार्यालयामार्फतीने दिनांक ११/०५/२०१९ रोजी शिवरकर रोड, केपीसीटी मॉल, हॉटेल प्लाझो, ५ वा मजला येथे रात्रौ. ००/४८ वा.चे सुमा. छापा घालुन कारवाई केली. सदरची कारवाई ही मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी केलेल्या पुणे पोलीस नोटीस प्रसिध्दी सोमवार दिनांक १४ ऑगस्ट २०१७ भाग ०१ पान क्रमांक २१८० मधील महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ०४ - क सोमवार जुलै ३, २०१७ /आषाढ १२, शके १९३९ प्रमाणे राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९६० मधील नियम क्रमांक ०३ अन्वये डान्सबार/डिस्कोथेक यांचे परवाने पोलीस विभागाकडून न घेता तसेच परवानाधारक नसतानाही विहीत वेळेपेक्षा जास्त कालावधीसाठी कर्णकर्कश मोठ्या आवाजात डि.जे/डिस्कोथेक वाजवण्याबाबत आहे.

बेकायदेशीर, विनापरवाना डि.जे./डिस्कोथेक चालु ठेवल्यामुळे तसेच हॉटेल / डिस्कोथेक मध्ये विनापरवाना मद्यविक्री केल्यामुळे हॉटेल मालक यांचेविरुध्द खालील प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

२) वानवडी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २७५/२०१९ मधील आरोपी नामे दिलीप शंकर भंडारी, मॅनेजर सनी राम मेवाती व डिजे चालक यांचे विरुध्द ध्वनी पर्यावरण संरक्षण कायदा कलम १९८६ चे कलम १५, ध्वनीप्रदुषण नियमन (नियमन व नियंत्रण) २००० चे नियम ३,४,५ तसेच दारुबंदी अधिनियमन कलम ६५ (ई), ७९,८२ प्रमाणे अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई दरम्यान एकुण ६४,७९६/ रुपये किमंतीचा मुद्देमाल (विदेशी मद्य व डि.जे. साधने) जप्त करण्यात आले आहे.

३) मुंढवा पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये दिनांक १२/०५/२०१९ रोजी रात्रौ. ०१/०० वा. चे सुमा. हॉटेल ब्लु शॉक, मुंढवा, पुणे येथे रात्रौ अैवध/बेकायदेशीर पणे विहीत वेळेपेक्षा उशीरापर्यंत विदेशी मद्य विक्री करताना मिळून आलेने हॉटेल मालक अविनाश प्रकाश कांबळे तसेच कामगार सुहास हनुमंत साळुंखे यांचेविरुध्द् मुंढवा पोलीस स्टेशन गु.र.नं. १४१/२०१९ अन्वये महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३३(क्ष) सह १३१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाईत एकुण १३,६३३/- रुपये किंमतीचा मद्य जप्त करण्यात आले आहे.

सदरची कारवाई ही आमचे आदेशाने परिमंडळ 05 कार्यालयाकडील स्टाफ (वाचक) पोलीस उप.निरी. बागुल, पो.हवा.1591 धिमधिमे, पो.ना.1305 उत्तेकर, पो.शि. 8320 कुंभार, पो.शि.8129 जाधव, म.पो.शि. 6238 मोरे, म.पो.ना. 6239 पाटील, म.पो.शि.11079 पिसाळ, म.पो.शि. 9434 काकडे यांचे पथकाने केली.

**(प्रकाश गायकवाड)**
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – ५
पुणे शहर